# शिक्षकांसाठी सूचना प्रथम भाषा : मराठी – इ. आठवी

## संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

### इयत्ता – आठवी, विषय : मराठी

| लेखी | तोंडी | एकूण गुण |
|---|---|---|
| ५० | १० | ६० |

**शिक्षकांसाठी महत्त्वाचे :**

- शासन निर्णय दि. १४ जुलै २०१७ नुसार 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातील चाचण्यांतून त्या त्या इयत्तांच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याने शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत क्षमतांच्या संपादणुकीची पडताळणी करणे आवश्यक आहे.
- राज्यात '१००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम' कार्यान्वित झाला आहे. या कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला मूलभूत वाचन क्षमता प्राप्त होण्यासाठी विद्यार्थिनिहाय कृती कार्यक्रम घेण्यात येत आहे. संकलित चाचणी–२ द्वारे त्या त्या इयत्तेच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याची मूलभूत वाचन क्षमता पडताळून पाहणे अपेक्षित आहे.
- इयत्ता दुसरी ते आठवीच्या प्रश्नपत्रिकांमध्ये प्रकट वाचनासाठी दिलेले उतारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या केवळ मूलभूत वाचन क्षमतेची पडताळणी करण्यासाठी आहेत. शिक्षक सूचना पत्रिकेत दिलेल्या निकषानुसार त्यासाठी गुणदान करावे.
- प्रत्येक इयत्तेत मूलभूत वाचन क्षमतेसाठी ५ गुण (मोठ्या आवाजात वाच) व मूलभूत लेखन क्षमतेसाठी ५ गुण (शब्द ऐकून लिही) असे एकूण १० गुण मूलभूत क्षमतांवर आधारित प्रश्नांसाठी आहेत.
- इयत्तानिहाय समजपूर्वक वाचन क्षमता तपासण्यासाठी स्वतंत्र गद्य/पद्य उतारा देण्यात आला आहे. तो प्रत्येक मुलाला वाचायला द्यावा व शिक्षक सूचना पत्रिकेतील निकषानुसार गुणदान करावे.

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द मोठ्याने व स्पष्ट वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्यांना शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) सहल | २) चाबूक |
| ३) आकारमान | ४) रोजनिशी |
| ५) दिनांक | ६) डौलदार |
| ७) डॉलर | ८) ग्रंथालय |
| ९) आच्छादित | १०) फॅशन |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावा. उदा. 'डौलदार' ऐवजी 'डऊलदार' किंवा 'फॅशन' ऐवजी 'फ्याशन' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्र. २) खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** अनेक भारतीय पदार्थ करण्यास. (गुण १)

**ब)** भारतीय आणि स्लोव्हियन (यांपैकी एक संस्कृती लिहिल्यास एक गुण व दोन्ही लिहिल्यास दोन गुण द्यावेत.) (गुण २)

**क)** छोट्या मोठ्या गोष्टींतून भारतीय संस्कृतीचा वारसा देणे, गाणे शिकविणे, रामायण-महाभारतातल्या काही कथा ऐकविणे. (गुण २)
(यांपैकी दोन बाबी लिहिल्यास २ गुण द्यावेत)

**प्र. ३) खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** देठाला फुलांचा भार कधीही होऊ नये. (गुण १)

**ब)** पाखरांसाठी आभाळ, गरिबांसाठी घर व अन्न, मुलांसाठी आई आणि चालत्या पावलांसाठी मोकळ्या वाटा. (गुण २)
(चार बाबींपैकी दोन बाबी लिहिल्यास दोन गुण द्यावेत.)

**क)** कुण्याही मायपदराशी खेळते राहू दे मूल. (गुण २)

**प्र. ४) खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** कारण माणसाने दिलेल्या सूचना अचूकपणे व न थकता काम करणारे यंत्र म्हणून (गुण १)

**ब)** संगणकाची गती, काम करण्याची अचूकता, माहिती साठवून ठेवण्याची क्षमता. (पैकी दोन बाबी लिहिल्यास दोन गुण द्यावेत.) (गुण २)

**क)** मानवाची उत्क्रांती, ग्रह ताऱ्यांविषयीचे ज्ञान, उपग्रहांवरील संदेशाची देवाण घेवाण, अणुऊर्जा संशोधन. (गुण २)
(२ बाबी लिहिल्यास १ गुण द्यावा.)

**प्र. ५) खाली लेखाचा काही भाग दिला आहे तो मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)
**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** प्रदूषण, रोगराई (गुण १)

**ब)** म्हणजे आरोग्य बिघडणे. ओला-सुका कचरा एकत्र टाकल्यामुळे, त्यातून तो वेगवेगळा करता येत नाही, कचरा गोळा करणाऱ्यांनी त्या दुर्गंधीत हात घातल्यामुळे. (गुण २)

**क)** ओला व सुका कचरा वेगळा करून, ओला कचऱ्याचे खत तयार करून, सुका कचरा कचरा वेचणाऱ्यांना देऊन. (गुण २)
या सारख्या कोणत्याही दोन बाबींसाठी दोन गुण द्यावेत.

**प्र. ६) खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.** (गुण १०)

**अ)** तोंडाला पाणी सुटले. (गुण २)

**ब) (१)** आमच्या शाळेसमोर आमराई आहे. (गुण २)

**क)** पुस्तक व शाळा या शब्दांना (चा, ची, चे) प्रत्यय लावून अर्थपूर्ण वाक्याला प्रत्येकी एक प्रमाणे गुण द्यावा. (गुण २)

**ड)** दुसऱ्या ओळीला शेवटी वारा किंवा 'रा' येईल अशी कुठलीही ओळ चालेल. (गुण १)

**इ)** उपमेय - डोळे, उपमान - हरिण (गुण १)

**फ)** भाजीभाकरी, वरणभात सारखा सामासिक शब्द स्वीकारावा. (गुण १)

**ग)** मनोवृत्ती (गुण १)

**प्र. ७) तुझ्या शाळेत साजरा करण्यात आलेला 'महिला दिन' या कार्यक्रमाचा अहवाल लिही.**
(गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन केले आहे.<br>• लेखन सुसंगत झाले आहे.<br>• विषयाला धरून मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• महिला दिनाच्या तपशिलाचे बारकावे नेमक्या शब्दात मांडल्याने लेखन प्रभावी झाले आहे.<br>• अहवालाची रचना व्यवस्थित झाली आहे. |

| गुण | निकष |
|---|---|
| ४ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन आहे.<br>• मर्यादित मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• लेखनात काही ठिकाणी सुसंगतपणा आढळतो.<br>• महिला दिनाच्या कार्यक्रमातील घटनांचा उल्लेख थोडा विस्ताराने केला आहे. |
| ३ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाक्यरचना बऱ्यापैकी नीट आहे.<br>• लेखन तुटक-तुटक आहे. एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे जाताना सुसंगतपणा दिसत नाही.<br>• महिला दिनाच्या कार्यक्रमातील घटनांचा उल्लेख मर्यादित शब्दांत केलेला आहे. |
| २ | अहवाल स्वरूपात लेखन नाही. मात्र दिलेल्या विषयावर लेखन करण्याचा प्रयत्न.<br>• वाक्यरचना विस्कळित.<br>• मुद्द्यांचा नेमकेपणा नाही. |
| १ | सुट्या-सुट्या वाक्यांचे किंवा काही शब्द बदलून वाक्यांचे परत-परत केलेले लेखन. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा विषयाला सोडून केलेले असंबद्ध लिखाण किंवा केवळ शब्दलेखन. |

**प्र. ८) गावामध्ये तंबाखूमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. याबाबत तुझे मत लिही.** (गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | • दिलेल्या विषयावर सखोल विचार करून मत मांडल्याचे दिसते<br>• स्वतःचे मत व्यक्त करताना सुसंगत सुरुवात विषयाचा योग्य विस्तार व योग्य शेवट यांची मुद्देसुद मांडणी केली आहे.<br>• लिहिताना योग्य उदाहरणाचे दाखले दिल्याने लेखन प्रभावशाली झाले आहे.<br>• शेवट करताना सकारात्मकरित्या घटना कशी हाताळता येऊ शकते याचे थोडक्यात स्पष्टीकरण आले आहे. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार केला आहे.<br>• स्वत:चे मत व्यक्त करताना सुरुवात, विषय विस्तार, शेवट केला आहे.<br>• लिखाणात उदाहरणांचा वापर केलेला आहे. |
| ३ | • दिलेला विषय समजून ढोबळ मांडणी केलेली आहे.<br>• लिखाणात उदाहरणांचा वापर केलेला आहे. |
| २ | • दिलेला विषय समजून ढोबळ मांडणी केलेली आहे. |
| १ | • दिलेल्या विषयाच्या संदर्भाने सुट्या वाक्यांचे लेखन केलेले आहे. |
| ० | असंबद्ध लेखन किंवा काहीही लिहिलेले नाही. |

**प्र. ९) सार्वजनिक पुरवठा होत असलेल्या पाण्याची शुद्धता तपासण्यासाठी स्थानिक शासन संस्थेकडे अर्ज लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती

**उद्दिष्ट** : लेखी स्व-अभिव्यक्ती तपासणे.

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन अर्ज लिहिलेला आहे.<br>• अर्जाला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• अर्जाचा आशय मुद्देसूद आहे. बारकावे व तपशील दिले आहेत.<br>• अर्ज लिहिण्यामागची भूमिकाही स्पष्ट केली आहे. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन अर्ज लिहिलेला आहे.<br>• अर्जाची सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• तपशिलाचा मुद्देसूद विस्तार केला आहे. |
| ३ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन अर्ज पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• अर्जाचा आशय लक्षात येईल असे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• अर्जातील लिखाण ओघवते नसले तरी वाक्यरचना नीट आहे. लिखाणात काही ठिकाणी सलगता, सुसंगतपणा नाही.<br>• विषयाचा विस्तार थोडक्यात आणि मर्यादित केलेला आहे. |
| २ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना व्यवस्थित नाही.<br>• लिहिताना विषयाचा तपशील दिलेला नाही.<br>• अर्जाची रचना विस्कळीत आहे. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार करून वाक्यांचे सुटे सुटे लेखन. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या संदर्भाचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण किंवा केवळ शब्दलेखन. |

**प्र. १०)    खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.**    (गुण ५)

**उद्दिष्ट :**

- हा प्रश्न विद्यार्थ्यांची मूलभूत वाचन क्षमता तपासण्यासाठी आहे.

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून घ्यावयाचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच.**

**उतारा :**

**रविवारचा दिवस, शाळेला सुट्टी होती. हवेत खूप उकाडा जाणवत होता. कबीर आणि मीरा अंगणात झाडाखाली खेळत होते. अचानक आकाशात काळेकाळे ढग जमले. विजांचा कडकडाट सुरू झाला. पावसाचे टपोरे थेंब पडायला लागले. कबीर आणि मीरा पावसात चिंब भिजले. अंगणात पाणी वाहू लागले. दोघेही पाण्यात नाचले. अंगावर पाणी उडवले.**

**तासाभराने आतून आईचा आवाज आला. ''कबीर, मीरा झालं ना खेळून आता? चला कपडे बदलून घ्या.''**

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | उताऱ्याचे योग्य गतीने विरामचिन्हे लक्षात घेऊन केलेले वाचन. |
| ४ | काही वाक्यांचे विरामचिन्हे लक्षात घेऊन केलेले वाचन. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा व अर्थाचा बोध होत नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होत नाही. |
| ० | उतारा वाचण्यात रस दाखविला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |

## तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. ११) खालील कवितेचे वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक कविता वाचायला देणार आहे. ती कविता वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायचीस.**

**उतारा :**

**निळ्या बिलोरी आभाळावर**
**मेघ काढती नक्षी,**
**त्या नक्षीच्या पुढ्यात सुंदर**
**घेत भरारी पक्षी.**

**उघडा दारे, उघडा खिडक्या**
**मनही आता उघडा,**
**ज्ञानाचे अन् विज्ञानाचे**
**पंख लेवुनि उडा.**

**शुद्ध मोकळ्या वातावरणी**
**रमून जावे ऐसे,**
**खुशाल गावे आणिक व्हावे**
**आपण अपुले आरसे!**

**चौकट तोडा आणिक जोडा**
**सर्व जगाशी नाते,**
**फुलून येतो श्वास गोजिरा**
**मनही मोठे होते...**

कवयित्री : आश्लेषा महाजन

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

- उत्तरे शोधण्यासाठी उतारा परत वाचण्याची संधी मुलास द्यावी.

**योग्य उत्तर गुण**

**अ) कवयित्री आपणास कशाचे पंख लावून उडण्यास सांगत आहे?** (१)

ज्ञानाचे आणि विज्ञानाचे

**ब) आपण आपला आरसा व्हावे म्हणजे काय करावे असे तुम्हाला वाटते?** (२)

स्वतः स्वतःला तपासावे, स्वतःतील गुण वाढवावेत दोष शोधून कमी करावेत या आशयाचे योग्य उत्तर स्वीकारावे.

**क) आपले मन केव्हा मोठे होते? असे कवयित्रीला वाटते?** (२)

बंधनाच्या चौकटी तोडल्या, जगाशी नाते जोडले तर मन मोठे होते.
(प्रत्येक बाबीस १ गुण द्यावा.)

■■■